अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
एस.आर.ए.बिल्डींग, ए-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-51.फोन
व फॅक्स-022 26591586, Email:-ccfmangrove@mahaforest.gov.in/ccfmmumbai@gmail.com

विषय :- कोकण विभागातील वेटलँड संदर्भात
पाणथळ तक्रार निवारण समितीची
बैठकीचे मंजूर इतिवृत्तांत.
जा.क्र.उप.व/कांकमुं/सभा/ ८५ /२०१७-१८
बांद्रा. दिनांक :- १६ /०१ /२०१८

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक पर्यावरण विभाग.
६. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/
वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
१२. श्री. . दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
१३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१४. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
१५. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.
१६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची 11 वी मासिक बैठक दिनांक 21/12/2017 रोजी मा.विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात आली सदर बैठकीची मंजूर इतिवृत्तांत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

**मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची 11 वी मासिक बैठक दि.21.12.2017**

**स्थळ :- मा. विभागीय आयुक्त यांचे कार्यालय कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.21.12.2017 रोजी कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. जगदिश पाटील | विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई. | विभागीय आयुक्त |
| 2 | श्री. एन. वासुदेवन | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक |
| 3 | डॉ. प्रशांत नारनवरे | जिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी |
| 4 | श्री. जयरामेगौडा आर. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | उप वनसंरक्षक |
| 5 | श्री. सिध्दराम सालीमठ, | विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई. | उप आयुक्त (महसूल) कोकण विभाग. |
| 6 | श्री . मंगेश जोशी | अप्पर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग. | अप्पर जिल्हाधिकारी |
| 7 | श्री. भरत शितोळे | अप्पर जिल्हाधिकारी, रायगड | अप्पर जिल्हाधिकारी |
| 8 | श्री. मिलिंद पंडितराव | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक | विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |
| 9 | श्रीमती वंदना सुर्यवंशी | जिल्हाधिकारी ठाणे | निवासी उप जिल्हाधिकारी ठाणे |
| 10 | श्री. विश्‍वास दि. गुजर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर. | अपर चिटणीस |
| 11 | श्री. नागेश वि. जाधव | पोलीस निरिक्षक, विशेष शाखा, ठाणे | पोलीस निरिक्षक |
| 12 | श्री.दादासाहेब चाबुकस्वार | उप आयुक्त नवी मुंबई, महानगरपालिका | उप आयुक्त नवी मुंबई |
| 13 | श्री. प्रमोद व्हो. पाटील | सिडको | नोडल अधिकारी |
| 14 | श्री. संजय दोंदे | आयुक्त मिरा-भाईदर महानगरपालिका. | सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण) |
| 15 | श्री. किरण सुरवसे | तहसिलदार वसई, जि. पालघर | तहसिलदार वसई. |
| 16 | श्री. पी.डी. चव्हाण | सहाय्यक अधिकारी | मुंबई शहर |
| 17 | श्री. पी.टी. गेदाम | सिडको | नियोजन अधिकारी |
| 18 | श्री. सुरेश कदम | पोलीस निरिक्षक, रत्नागिरी | पोलीस निरिक्षक |
| 19 | श्री. ओमप्रकाश दिवटे | मिरा-भाईंदर महानगर पालिका, | उप आयुक्त |
| 20 | श्री. विनोद पुन्शी | नवी मुंबई एन्वायरमेंट प्रीझरवेशन सोसायटी | संचालक |
| 21 | श्री. संजय हिरवडे | वसई-विरार महानगरपालिका | अपर आयुक्त |
| 22 | श्री. विजय बलमवार | मीरा-भाईंदर महानगरपालिका | उप आयुक्त |
| 23 | श्री. स्टॅलिन डी. | वनशक्ती | संचालक |
| 24 | श्रीमती. मनिषा प्रधान | ठाणे महानगरपालिका | प्रदुषण नियंत्रण अधिकारी |

दि.21/12/2017 च्या बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी उपस्थिती सभासदांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | कोकण वेटलँड तक्रार निवारण नवीन वेबसाईडला सुरुवात करणे. | सदस्य सचिवांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची Website (konkanwetland.com) ही वेटलँन्ड शी संबंधित तक्रारींची नोंद होणयाकरिता सुरुवात केली आहे असे सांगितले. तसेच समितीने Website च्या प्रसिध्दी संदर्भात चर्चा झाली त्यानुसार दि. 16 डिसेंबर 2017 रोजी कांदळवन कक्षाने कांदळवन स्वच्छता मोहिम (Clean Mangrove Campaign) आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यक्रमात कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची Website देखील आयोजित करण्यात आली असून या संदर्भात Press Note ही देण्यात आली होती असे सदस्य सचिवांनी सांगितले. या संदर्भात समितीने चर्चे दरम्यान पुन्हा एकदा Press Note देण्यास आणि श्री. मुले, उपसंचालक यांच्या मदतीच्या सहाय्याने प्रसिध्दी करण्याचे आदेश देण्याच्या सुचना दिल्या. | सदस्य सचिव |
| 2 | टोल फ्री क्र. 1926 या सेवेचा लाभ घेणे. | अ) Ex. Director, Mangrove and Marine Biodiversity conservation foundation यांनी सदर वर्षात 1926 Hello Forest सेवा चालू करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. पुढील वर्षासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून ते Additional Chief Secretary (Environment) ला पत्र लिहीणार आहे असे सदस्य सचिवांनी सांगितले. या संदर्भात Press Note ही देण्यात आली होती. टोल फ्री क्र. 1926 या सेवेचा लाभ घेण्यासंदर्भात समितीने पुन्हा एकदा प्रसिध्दी करण्याच्या सुचना दिल्या आहेत.<br>ब) समितीने Nodal officer ची नेमणूक करुन त्यांना टोल फ्री क्र.1926 या सेवेत प्राप्त झालेल्या तक्रारींवर योग्य ते प्रशिक्षण देऊन प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करुन योग्य ती कार्यवाही करण्यासंदर्भात सांगितले त्यानुसार प्रत्येक जिल्हयामधून 2 Nodal Officer (एक महसूल व एक वन विभाग) ची माहिती देण्यास जिल्हा प्रशासनाला सांगितले तसेच त्यासाठी समितीला आवश्यक असणारी माहिती पुढील स्वरुपात प्राप्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>[नोडल अधिकाऱ्याचे नाव \| पद \| दुरध्वनी क्रमांक \| ई.मेल ID]<br>या संदर्भात फक्त सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी यांच्या कडून | सदस्य सचिव आणि सर्व जिल्हाधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | माहिती प्राप्त झाली असून इतर सर्व जिल्हयांना Nodal अधिकाऱ्यांची निवड करुन या बाबत तात्काळ माहिती सादर करण्यास समितीने सांगितले. | |
| 3 | जुन्या तक्रारींचा आढावा<br>a) श्री. विनोद पुन्शी व इतर<br>b) श्रीमती श्रुती अगरवाल<br>c) श्रीमती मनी अय्यर<br>d) श्रीमती रश्मी चौधरी<br>e) श्रीमती कांचन पुरोहीत (Complaint Regarding Destruction of Wetland behind NRI complex in sector 60 Nerul, New Mumbai) | मौजे नेरुळ सेक्टर 60 मधील पाणथळ नमूद यादीतील एक वेटलँन्ड असल्याने तात्काळ सीडकोला तेथील काम थांबविण्याबाबत आदेश देण्यात आले तसेच सदरचा तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीकरिता संबंधीत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. सदस्य सचिवांनी समितीला सांगितले की, दि.24/11/2017 च्या पत्रानुसार सिडको यांनी,Land pockets at NRI complex in sector 60 Nerul, Navi Mumbai हे क्षेत्र National Wetland Inventary and Wetland Atlas मधून काढण्यासाठी अध्यक्षांना विनंती केली यावरुन पुढीलप्रमाणे मुद्दे दिले आहेत.<br>A) According to 7/12 Extracts Dated 03/02/1970, these pockets of lands were earlier described as salt pans. As per the definition of "Wetland" mentioned in the section 2(1) (g) of the wetland (Conservation and Mangement) Rules, 2017 these pockets are not wetland since they are human made water bodies/tanks specifically constructed for salt production.<br>B) According to approved CZMP maps issued by the CIDCO, these pockets of lands falls in CRZ-II. According to section 3 of the Wetland (Conservation and Mangement) rules, 2017 these lands are already covered under Coastal Regulation Zone Notification, 2011.<br>या सर्व बाबींचा विचार करुन समितीने पुढीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले आहेत.<br>1) The said water body (behind NRI complex in sector 60 Nerul, Navi Mumbai) is mentioned in National Wetland Inventory and Assessment (NWIA), Prepared by SAC, Ahmedabad.<br>2) The Hon'ble Supreme Court vide its order dated 08/02/2017 and 04/10/2017 has directed that, all the Wetlands (1,75,740) of more than 2.25ha, which are mentioned in NWIA should continue to remain protected on the same | संबंधित यंत्रणा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | principles as were formulated in rules 4 of the Wetland (Conservation and Mangement) Rules, 2010.<br>3) RFO,नवी मुंबई यांच्या अहवालानुसार या पाणथळावर 1 ते 2 मीटर अंतरावर माती टाकल्याचे सांगितले.<br>वरिल सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन समितीने पुढील निर्णय घेतले आहेत.<br>1) The waterbody behind the NRI Complex in sector 60 Nerul, Navi Mumbai is a "Wetland" mentioned in NWIA. Based on the direction of Hon'ble Supreme Court, it has to be protected according to rule 4 of the Wetland (Conservation and Mangement) rules, 2010.<br>2) Committee has directed CIDCO to maintain status quo on the waterbody until further order of Hon'ble Supreme Court.<br>3) Committee has directed The CIDCO to restore the waterbody back to its original condition by removing the debris from the site. | |
| 4 | श्री. स्टॅलिन डी<br>Complaint Regarding Destruction of Wetland, Goregaon (East) Mumbai. | या तक्रारी संदर्भात मागील बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार समितीने जिल्हाधिकारी मुंबई यांना विचारणा केली असता त्यांनी पुढील आठवडयात अहवाल सादर करणार असे समितीला सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| 5 | श्री. रोहित जोशी :- (स्वामी समर्थ मार्ग,कोपरी ठाणे पुर्व) | या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका त्यांच्या अहवालात जागेचे मालक श्री. चेतन रमेश तांडेल व इतर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत कोपरी पोलीस विभागाला कळविण्यात आलेले आहे असे सांगितले आणि त्यांच्या दि.18/12/2017 च्या अहवालानुसार तेथील जागेवरील डेब्रिज उचलण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे त्याचे फोटो अहवालासोबत जोडलेले आहेत तसेच RRC (महसूल वसुली प्रमाणपत्राबाबत) यांनी जिल्हाधिकारी ठाणे यांना प्रस्ताव दि.4/12/2017 रोजी पाठविलेला आहे असे सांगितले. | ठाणे महानगरपालिका |
| 6 | श्री. फ्रान्सिस डिसोजा:- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220):- | श्री. फ्रान्सिस डिसोझा यांच्या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि. 12/01/2018 अशी आहे. उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी संबंधित सर्वांना नोटीस | जिल्हाधिकारी, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निर्गमीत केली आहे असे तहसिलदार वसई यांनी सांगितले. तेथील जागेवर पुन्हा अतिक्रमण होत असल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करा असे समितीने बैठकीमध्ये तहसिलदार वसई यांना आदेश दिले. | |
| 7 | श्री. अनंत दत्तात्रय पाटील :- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | श्री.अनंत दत्तात्रय पाटील यांच्या तक्रारी संदर्भात तहसिलदार,वसई यांनी या बैठकीमध्ये अहवालानुसार दिवाणी न्यायालयास स्थगिती उठविण्यासाठी दि.12/06/2017 रोजी विनंती केलेली आहे व त्याची पुढील सुनावणी दि. 12/01/2018 अशी आहे. उर्वरित अतिक्रमण हटविण्यासाठी संबंधित सर्वांना नोटीस निर्गमीत केली आहे असे तहसिलदार वसई यांनी सांगितले. तेथील जागेवर पुन्हा अतिक्रमण होत असल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करा असे समितीने बैठकीमध्ये तहसिलदार वसई यांना आदेश दिले. | जिल्हाधिकारी, पालघर |
| 8 | New Link Road Residence Forum, Dahisar West :- | समितीने या संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना एका आठवडयाच्या आत अंतरिम अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |
| 9 | धीरज परब:- | श्री. धिरज परब यांच्या तक्रारी संदर्भात समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना एक महिन्याची मुदत अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार काही प्रमाणात अतिक्रमण हटविण्यात आल्याचा अहवाल देखील त्यांनी सादर केलेला आहे.<br>मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्याकडून दि.4/12/2017 आणि दि.19/12/2017 रोजी प्राप्त झालेल्या तीन अहवालाची माहिती खालीलप्रमाणे आहे.<br>1) मौजे घोडबंदर येथील श्री. रोकश धरत यांचे ग्रीन 18 ॲटोमोबाईल सेंटरचे बांधकाम, ओमकार ॲटोमोबाईल यांचे पत्राशेडचे बांधकाम व लोखंडी कंटेनरमधील 8 रुमचे बांधकाम ही सर्व अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेने हटविलेली आहेत.<br>2) भाईंदर, पर्व येथील सर्वे क्र. 212 (जुना) नवीन 20 हिस्सा क्र.01पै येथील बांधकाम, नवघर चाळघर येथे बांबू व ताडपत्रीच्या सहाय्याने उभारण्यांत आलेल्या 52 झोपडयांचे बांधकाम, नवघर स्मशानभुमीच्या मागे कॉलम व पत्र्याचे बांधकामे तसेच सदर ठिकाणी बांबू व ताडपत्रीच्या उभारण्यात आलेल्या 41 झोपटया ही सर्व अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेने जे.सी.बीच्या सहाय्याने हटविण्यात आले आहे.<br>3) मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील प्रभाग समिती क्र. 2 अंतर्गत येणाऱ्या अवर लेडी ऑफ नाझरेत चर्च | आयुक्त,मिरा-भाईंदर महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मागील लालबहादूर शास्त्री नगर व नेहरु लगत एकूण 147 अनधिकृत झोपटया जे.सी.बीच्या सहाय्याने हटविण्यात आले आहे.<br>समितीने मीरा भाईंदर महानगरपालिकेस उर्वरित अतिक्रमण हटविण्यास विचारणा केली असता त्यांनी अतिक्रमण हटविण्याचे काम पुर्णपणे चालू असून तेथे काही व्यक्ती पुन्हा अतिक्रमण करत असल्याची माहिती त्यांनी समितीला दिली तसेच आता पर्यंत 147 लोकांवर गुन्हे दाखलही करण्यात आले आहे असे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनीधीने सिमितीला सागितले. वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन समितीने पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे आणि वाटल्यास त्यासाठी पोलीसांच्या सहाय्याने योग्य रितीने तपासणी करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे सांगितले. | |
| 10 | श्री. नंदकुमार पवार:- (बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | या तक्रारी संदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सद्यस्थितीची पहाणी करुन FIR दाखल केली असल्याचे निवासी जिल्हा अधिकारी, ठाणे यांना सांगितले. या तक्रारी संदर्भात मागील बैठकीमध्ये समितीने जिल्हाधिकारी ठाणे यांना त्यांचा अपेक्षित अहवाल मागीतला होता, परंतु अद्याप त्यांच्या कडून कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाहीत त्यानुसार समितीने त्यांना एका आठवडयात त्यांचा अंतरिम अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे, |
| 11 | श्री. ॲल्विन विन्सॅट रॉड्रीग्ज :- (मौजे बोळींज , स.न. 390 ता. वसई जि. पालघर) | विषयांकीत तक्रारीच्या अनुषंगाने मागील बैठकीत चर्चा करण्यात आलेली होती. सदरचा तक्रार अर्ज हा भात शेतीचे प्लॉट होणारे अतिक्रमण संदर्भातील होता. वेटलॅन्ड नियमानुसार वेटलॅन्ड व्याख्या भातशेती क्षेत्राचा समावेश नाही. त्यामुळे सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्याबाबत विचार करित असताना श्री.स्टॅलिन यांनी सदरचे क्षेत्र भातशेतीचे जरी असले तरी पर्यावरणीयदृष्टया अत्यंत महत्वाचे असून SAC ने निश्चित केलेल्या वेटलॅन्डच्या यादीतील आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्याबाबत विनंती केली. समितीने त्यांची विनंती मान्य करुन संबंधित तहसिलदार यांना जागेचे GPS रिडींग घेऊन सदरचे क्षेत्र NWIA या यादितील वेटलॅन्ड मध्ये येते किंवा कसे ? यांची शहानिशा करणेबाबत आदेश दिले होते.<br>या संदर्भात चर्चे दरम्यान अप्पर प्रधान मुख्य | जिल्हाधिकारी , पालघर आणि सदस्य सचिव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वनसरंक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांनी समितीला सांगितले की मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार river streams and Paddy fields हे क्षेत्र वेटलँन्ड नियमानुसार वेटलॅन्ड व्याख्येत या क्षेत्राचा समावेश नाही. या संदर्भात समितीने पुन्हा एकदा मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश तपासण्यास सांगितले. | |
| 12 | इतर विषय | समितीच्या अध्यक्षांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे सुचित केले की प्रत्येक जिल्हयातून त्या वन विभागाशी सल्लामसलत करुन कमीत कमी एक अशी योग्य त्या वेटलॅन्ड क्षेत्राची निवड करावी जी जैवविविधतेने व पर्यावरणीयदृष्टया महत्वाची आहे. या संदर्भात एका महिन्याच्या आत वेटलँन्ड क्षेत्राची निवड करावी जेणेकरुन स्थानिक नागरीकांच्या सहाय्याने वेटलँन्ड क्षेत्र पर्यटन स्थळ (Eco-Tourism) म्हणून विकसीत करता येईल. | |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.

Scanned by CamScanner